दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.९ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २५४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 9 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 254 ● Pages 4 ● Rate 4 Rs




## राज्य सरकार सुरु करणार
# छावा राईड ॲप

मुंबई (वृत्तसंस्था)-चालकाला सन्मानजनक मोबदला आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देणारे राज्य शासनाचे अधिकृत यात्री प लवकरच एसटी महामंडळामार्फत सुरू करण्यात येत आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते मंत्रालयातील आपल्या दालनामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या ग्रीगेटेड पॉलिसीच्या (समुच्चयक धोरण) आधीन राहून राज्य शासनाचे यात्री प बनवण्याच्या अंतिम मसुद्यावरील चर्चेवेळी बोलत होते. या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व इतर अधिकारी उपस्थित होते.मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, राज्य सरकारने मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, भरमसाठ नफा कमवून प्रवासी व चालकांना वेठीस धरणाऱ्या खाजगी कंपन्यांच्या जोखंडातून मुक्त करण्याच्या प्रमाणित हेतूने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रवासी ॲप बस, रिक्षा, टॅक्सी व ई-बस या वाहन सेवा करीता सुरू करण्याचे निश्चित केले आहे. सदर प राज्य शासनाच्या परिवहन विभागाच्या सहकार्याने एसटी महामंडळामार्फत सुरू करण्यात येईल. भविष्यात एसटी महामंडळाला उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करणे व प्रवाशांना एक विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे हा उद्देश समोर ठेवून हे शासकीय प एसटी महामंडळाने चालवणे योग्य राहील, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

## ॲपमुळे मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील-मंत्री प्रताप सरनाईकांचा विश्वास

या ॲपला जय महाराष्ट्र, महा - राईड, महा-यात्री, महा-गो, छावा राईड यापैकी एखादे नाव देण्या बाबत चर्चा झाली. नवीन शासकीय ॲप ला छावा राईड ॲप हे नाव द्यावे असे सर्वानुमते ठरले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या अंतिम मान्यतेने हे ॲप लवकरच कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.एसटी महामंडळातर्फे चालवण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या अधिकृत ॲप द्वारे रोजगाराची संधी मिळणाऱ्या मराठी तरुण- तरुणींना मुंबै बँकेच्या माध्यमातून विशेष आर्थिक पाठबळ देण्यात येईल असे आश्वासन बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी दिले. या तरुण-तरुणींना रोजगार देण्यासाठी मुंबई बँकेच्या माध्यमातून वाहन खरेदीसाठी १० टक्के व्याजदराने कर्ज दिले जाईल. तसेच अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ, भटके विमुक्त महामंडळ, ओबीसी महामंडळ आणि एमएसडीसी या संस्थांतर्फे ११ टक्के व्याज परतावा अनुदानाच्या स्वरूपात देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला जाणार असून, त्यामुळे हे कर्ज बिनव्याजी असल्यासारखे आहे. असे प्रतिपादन आमदार प्रवीण दरेकर यांनी केले.मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, केंद्र सरकारच्या ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्वानुसार या ॲप ची नियमावली अंतिम टप्यात आहे. सध्या खाजगी संस्था अनाधिकृत ॲपच्या माध्यमातून प्रचंड नफा कमवतात. त्यासाठी त्या कंपन्या चालक व प्रवासी यांची लूट करीत आहेत. एसटी महामंडळडे कडे यंत्रणा, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ व जागा मुबलक प्रमाणात असल्यामुळे शासनाने असे ॲप विकसित करून चालविण्यासाठी एसटी महामंडळाला दिल्यास त्याचा फायदा प्रवाशां बरोबर एसटी महामंडळाला देखील होईल.राज्य शासनाचे अधिकृत यात्री प चालविण्यासाठी एसटी महामंडळाची प्रवाशा प्रती असलेली निष्ठा, आणि वर्षानुवर्षापासूनची विश्वासार्हता उपयोगी पडणार असून उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण होणार असल्याचे मत प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केले आहे.





## मल्टीस्टेट मध्ये बुडालेल्या खातेदारांच्या आशा पल्लवीत,खा.सौ.रजनीताई पाटीलांचे मानले आभार

**केज । प्रतिनिधी**

दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली मल्टीस्टेट बँकाच्या घोटाळ्यां विषयीच्या महत्वपूर्ण बैठकीत सहभागी होऊन खा.सौ.रजनीताई पाटील यांनी मल्टीस्टेट बँकाच्या गैरकारभाराने आर्थिक नुकसान झालेल्या व जीवन संपवलेल्या खातेदार, ठेवीदारांच्या मदतीसाठी परखडपणे भूमिका मांडली.याविषयी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षते खाली एक समिती तयार करण्यात आली जलद गतीने चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करून बाधीत खातेदारांना न्याय देण्यात येईल असे आश्वासन बैठकीचे अध्यक्ष गृहमंत्री अमित शहा आणि चौकशी समितीचे अध्यक्ष राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी खा.सौ. रजनीताई पाटील यांना दिल्यामुळे ठेवीदार व खातेदार यांच्या आशा पल्लवित झाल्या असून त्यांनी खा.सौ.रजनीताई पाटील यांचे आभार मानले आहेत.



## न्यू इंटेल कॉम्प्युटर,केज संस्थेला एम के सी एल चा मानाचा पुरस्कार

**केज । प्रतिनिधी**

न्यू इंटेल कॉम्प्युटर केज ही एम एस सी आय टी MSCIT ची केज तालुक्यातील सर्वात जुनी आणि दर्जेदार संस्था असून,२०२५ या शैक्षणिक वर्षात MSCIT आणि 'क्लिक' या दोन्ही कोर्समध्ये मिळून संपूर्ण जिल्ह्यात सर्वाधिक प्रवेश संख्या नोंदवल्याबद्दल या संस्थेला MKCL (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड) तर्फे गौरवण्यात आले.ही गौरवपर पारितोषिक चघउङच्या विभागीय बैठकीत संस्थेचे प्राचार्य श्री.गणेश सत्वधर यांनी स्वीकारले.हे पारितोषिक MKCL व्यवस्थापकीय संचालक श्री.समीर पांडे सर आणि श्री. बालकिशन बलदवा सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

न्यू इंटेल कॉम्प्युटर ही संस्था गेल्या २५ वर्षां पासून गुणवत्तापूर्ण संगणक शिक्षण देण्यासाठी ओळखली जाते.या संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवले असून, केज व परिसरात संगणक शिक्षण क्षेत्रात एक विश्वासार्ह नाव निर्माण केले आहे.या यशाबद्दल मित्रमंडळी व विद्यार्थी यांच्या कडुन संचालक गणेश सत्वधर व सत्वधर परिवाराचे योगदानाबद्दल स्वागत केले आहे.




## बीडमध्ये ऊसतोड मजुरांचा मेळावा; अजित पवार आणि बारीकराव भांगे यांची पाच मिनिटे चर्चा

**वडवणी । लोकपत्रकार भांगे**

काल दिनांक ७ ऑगस्ट रोजी बीड येथे ऊसतोड मजूर कामगारांचा भव्य मेळावा आणि आरोग्य शिबिर पार पडले. या मेळाव्यात ऊसतोड मजुरांसाठी वेगवेगळ्या शासकीय योजना, आरोग्य सुविधा आणि कल्याणकारी उपक्रमांची माहिती देण्यात आली. ऊसतोड कामगारांच्या आरोग्य तपासणीसाठी जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने विशेष वैद्यकीय पथक उपस्थित होते.या निमित्ताने ऊसतोड कामगार वाहतूक मुकादम संघटनेचे सचिव आजिनाथ बारीकराव भांगे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेतली. चर्चेदरम्यान ऊसतोड मजुरांच्या हंगामी स्थलांतरातील अडचणी, अपुऱ्या आरोग्य सुविधा, सामाजिक सुरक्षा योजना, तसेच वाहतूक मुकादमांना भेडसावणाऱ्या समस्या यावर सविस्तर चर्चा झाली.बैठकीत राज्याचे कृषी व कामगार मंत्री धनंजय मुंडे उपस्थित होते. ही चर्चा पाच मिनिटे सुरू राहिली. यामध्ये संघटनेने मांडलेल्या मागण्यांबाबत उपमुख्यमंत्री पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे समजते. काही मुद्द्यांवर तत्काळ अंमलबजावणीची हमी देण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.मेळाव्यात शेकडो ऊसतोड मजूर, महिलांचा मोठा सहभाग, तसेच वाहतूक मुकादमांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. आरोग्य शिबिरात रक्तदाब, मधुमेह तपासणी, डोळ्यांची तपासणी यासह काही गंभीर आजारांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.दरम्यान, बारीकराव भांगे आणि अजित पवार यांची ही भेट बीड जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली आहे. ऊसतोड मजुरांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सामाजिक सुरक्षेसाठी संघटनेच्या पुढील आंदोलनाच्या दिशाही या बैठकीतून ठरतील, अशी चर्चा सुरू आहे.



## शहरातील अनाधिकृत बॅनर होर्डिंग्जच्या समस्येवर तात्काळ उपाययोजना करा- नितीन सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**

पालकमंत्री अजीत पवार यांना ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने निवेदन सादर केले आहे. बीड शहरातील मुख्य मार्गांवर (जालना रोड, नगर रोड) आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्यांजवळ लावले जाणारे अनाधिकृत बॅनर शहराचे विद्रूपीकरण करत असून, वाहतुकीस अडथळा निर्माण करत आहेत. पालकमंत्री अजीत पवार यांनी माझ्या समोर जिल्हाधिकारी व नगरपरिषद यांना सुचना दिल्या आहेत. आमच्या मागण्या मुख्य मार्गांवरील दुभाजकांवर नगरपरिषदेने पुणे-संभाजीनगरच्या धर्तीवर जाहिरात होर्डिंग्ज उभारावेत. यामुळे नगरपरिषदेला महसूल मिळेल, अनाधिकृत बॅनर थांबतील आणि वाहतूक सुरळीत होईल. मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहावरील होर्डिंग तात्काळ हटवावे. १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत उपाययोजना न झाल्यास ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन..!



## शिवसेना शिंदे गटाकडून आदिवासी दिवस साजरा ;क्रांतिकारकांच्या कार्याला दिला उजाळा

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शिवसेना शिंदे गटाचा वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यास आ.चंद्रकांत रघुवंशी व आ.आमश्या पाडवी यांनी पुष्पहार अर्पण करून विश्व आदिवासी गौरव दिवस साजरा केला. यावेळी आदिवासी विजयाच्या घोषणा देण्यात आल्या. तळोदा शहरातील शिवसेनेचा मध्यवर्ती कार्यालयापासून ते भगवान बिरसा मुंडा चौकापर्यंत ढोल ताशांच्या गजरात सायंकाळी ५ वाजता मिरवणूक काढण्यात आली. यावेळी आ.चंद्रकांत रघुवंशी व आ.आमश्या पाडवी यांनी बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यास पुष्पहार करीत आदिवासी क्रांतिकारकांच्या कार्याला उजाळा देत अभिवादन केले. 'जय जोहार,जय आदिवासी', ' देव मोगरा माता की, जय', ' भगवान बिरसा मुंडा की, जय' अशा घोषणा उपस्थित कार्यकर्त्यांनी दिल्या.

यावेळी तालुकाप्रमुख अनुपकुमार उदासी, शिवसेना पक्ष लोकसभा उपाध्यक्ष संदीप परदेशी, नंदुरबार पालिकेचे माजी नगराध्यक्ष कुणाल वसावे, माजी सभापती कैलास पाटील,शहर प्रमुख जितेंद्र दुबे,माजी सभापती हितेंद्र क्षत्रिय,नंदुरबार कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती दीपक मराठे,प्रविण वळवी, केसरसिंग क्षत्रिय,विकासगीर गोसावी,भटू पाडवी,गणेश पाडवी,राहूल पाडवी,गणेश राणे,अविनाश मराठे,आरिफ शेख,सईद पठाण,सूरज माळी,शाबिर मिस्त्री,मुकेश पाडवी,कल्पेश चौहान,नितु सोनार,पप्पू मराठे,मयुर पाटील,विकास क्षत्रिय,इमरान शिकलीकर,रोनक पाडवी,सिद्धू पाडवी,रवी पाडवी,दिनेश ब्राह्मणे,विशाल पाडवी,बादल पाडवी,कांत्या पाडवी,बंटी सूर्यवंशी,मनीष बत्तीसे, योगेश्वर पाडवी,प्रकाश पाडवी,बादल पाडवी,अक्षय पाडवी उपस्थित होते.



संपादकीय

# ‘बेस्ट’ परवड

मुंबई शहरात ओला, उबेर, रिक्षा-टॅक्सीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत चालली असली तरी, आजही ३४ लाख प्रवासी बेस्टच्या बसेसमधून प्रवास करतात. प्रवाशांनी बेस्टकडे पाठ फिरवली, ‘बेस्ट’ची आर्थिक स्थिती मंदावली, बेस्ट तोट्यात जात असल्याची चर्चा गेल्या अनेक महिन्यांपासून ऐकायला येते; परंतु वास्तव हे आहे की, सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला परवडणारी ही सेवा भविष्यात अखंड सुरू राहावी अशी मुंबईकरांची अपेक्षा आहे. कामगार कर्मचाऱ्यांच्या घामावर मुंबई उभी आहे. श्रीमंतीचा मुकुट मुंबईच्या डोक्यावर असला तरी, कामगारांच्या श्रमावर मुंबईचे वैभव टिकून आहे. मुंबईत आलेला माणूस हा उपाशी राहात नाही, त्याला काम मिळते असा देशभर प्रचार झाल्याने मुंबईत देशाच्या कानाकोपऱ्यांतून लोक रोजगारांसाठी येतात. बेस्टसारख्या परिवहन सेवेत काम करणारा कर्मचारी हा इथला भूमिपुत्र आहे. बेस्टमधल्या नोकरीत राहून त्याने मुंबईकरांची सेवा केली, त्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर आर्थिक ताण सोसावा लागतो ही बातमीसुद्धा मनाला क्लेशदायक वाटते. निवृत्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना थकबाकी मिळत नसल्याने बेस्ट उपक्रमाला प्रचंड रोष सहन करावा लागत आहे. बेस्टमधील जवळपास साडेचार हजार निवृत्त कर्मचारी व अधिकाऱ्यांची सप्टेंबर २०२२ पासून उपदानाची तसेच २०१९ पासून अंतिम देणी बाकी आहेत. ही रक्कम जवळपास ५०० ते ६०० कोटींच्या घरात आहे. आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी दोन दिवसांपूर्वी आझाद मैदानात कर्मचाऱ्यांना आंदोलन करावे लागले. देणी भागवण्यासाठी वेगळ्या स्वतंत्र निधीची तरतूद करावी, अशी मागणी कर्मचारी युनियनने यावेळी केली. मात्र बेस्टची अवस्था ‘आंधळं दळतंय आणि कुत्र पीठ खातंय’ अशी झालेली दिसते. याला गेली तीस वर्षे सत्ता भोगणारी उबाठा सेना जबाबदार असल्याचा आरोप काँग्रेसचे माजी आमदार मधु चव्हाण यांनी केल्याने, महाविकास आघाडीतील पक्षही उबाठा सेनेला जबाबदार धरतात हे अधोरेखित झाले. बेस्टमध्ये मराठी कर्मचाऱ्यांचा भरणा आहे. कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांना त्यांची देणी मिळत नाहीत, आता मराठीचा पुळका आलेल्या उबाठा सेनेला बेस्ट कर्मचाऱ्यांनी प्रश्न विचारायला हवेत.बेस्ट बसच्या जन्माचा प्रवास प्रेरणादायी आहे. घोड्याने ओढणाऱ्या ट्रामपासून, तर डिझेल-इलेक्ट्रिक हायब्रीड एसी बस ते प्रदूषणमुक्त इलेक्ट्रिक बसपर्यंत, विविध प्रकारच्या बसेस व तितक्याच प्रकारच्या वाहतूक सेवा बेस्टने मुंबईकरांना आजवर दिल्या. बेस्टचा जन्म इ. स. १८७३ मध्ये ट्रामवे कंपनीच्या रूपात झाला. ट्राम गाड्यांना वीज पुरवता यावी म्हणून बेस्टने वाडी बंदर येथे नोव्हेंबर १९०५ मध्ये औष्णिक वीज केंद्र स्थापन केले त्यातूनच पुढे बेस्टवर मुंबईला वीज पुरवठा करण्याची जबाबदारी आली. बेस्टची पहिली बस १५ जुलै १९२६ मध्ये अफगाण चर्च ते क्रॉफर्ड मार्केट या मार्गावर धावली. मुंबईकरांनी या सेवेचे जोरदार स्वागत केले. १९४७ मध्ये देश स्वतंत्र होण्याच्या एक आठवडा आधीच बेस्ट मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित आली. बेस्ट ही भारतातल्या सगळ्यात मोठ्या शहरी परिवहन सेवांपैकी एक मानली जाते. मुंबईच्या कोणत्याही भागात जायला सध्या बेस्टची सेवा उपलब्ध आहे. आर्थिक तोट्यात सापडल्याने बेस्टच्या गाड्यांची संख्या दिवसेंदिवस रोडावत चालली आहे. आज बेस्ट उपक्रमाचा तोटा हा साधारण बारा हजार कोटींच्या जवळपास पोहोचला आहे. एकेकाळी ४२ हजार संख्या असलेला कर्मचारी वर्ग २४ हजारांवर आला आहे. त्यामुळे बेस्टमध्ये कोणतीच गोष्ट शाश्वत राहिलेली नाही. त्यात बेस्टला कायमस्वरूपी महाव्यवस्थापक नाहीत. गेल्या दोन ते तीन वर्षांतच तीन ते चार महाव्यवस्थापक होऊन गेले. आजच्या घडीला आशीष शर्माही बेस्टचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत.खासदार नारायण राणे यांनी १७ एप्रिल रोजी बेस्ट महाव्यवस्थापकांची भेट घेऊन बेस्टमधील अनेक प्रश्न मार्गी लागावेत, यासाठी प्रयत्न केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे बेस्ट प्रशासनातील प्रलंबित प्रश्नांवर चर्चा झाल्यानंतर २७ एप्रिल रोजी बेस्ट तिकीट वाढीचा निर्णय झाला. बेस्ट बस भाडेवाडीमुळे बेस्टच्या तिजोरीत अंदाजे वार्षिक ६०० कोटी रुपये जमा होतील, असा अंदाज आहे. यामुळे बेस्टला थोडीफार आर्थिक मदत होईल. या निर्णयामुळे सध्या बेस्टच्या उत्पन्नाचा दिवसाला तिकीट दरातून मिळणारा अडीच कोटी रुपयांचा आकडा साडेतीन कोटींपर्यंत पोहोचला. मुंबई महापालिकेने बेस्टला विश्वासात न घेता, तीन वर्षांपूर्वी किमान भाडे पाच रुपये करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचा फटका बेस्ट प्रशासनाला पडला होता. मुंबई महापालिकेने ज्या पद्धतीने मदत करण्याचे आश्वासन दिले होते, तेवढी रक्कम बेस्टच्या पदरात पडत नसल्याने, दिवसेंदिवस बेस्टच्या तोट्यातील आकडा वाढत गेला होता. एकेकाळी हाच विद्युत पुरवठा विभाग बेस्टच्या परिवहन उपक्रमाला पूरक ठरून तग देऊन राहिला होता, म्हणून आज इतकी वर्षे बेस्टचा वाहतूक विभाग हा अखंडपणे सुरू राहिला. मात्र आता सर्व बाजूंनी आर्थिक कोंडी झाल्याने बेस्टच्या परिवहन विभागाला उतरती कळा लागली. बेस्ट प्रशासन हे मुंबई महापालिकेत विलीनीकरण करावे, ही मागणीही सातत्याने कर्मचारी संघटनांकडून केली गेली. बेस्ट प्रशासनाने भाडेवाढीच्या निर्णयामुळे काहीसा बेस्टला दिलासा मिळाला असला तरी, तोट्यातून मार्ग कसा काढायचा हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे.

# ग्राहकाच्या पाठीशी न्यायव्यवस्था



ग्राहकाने विमा काढण्यासाठी फॉर्म भरला. त्यात भरलेली माहिती खरी/खोटी/अर्धी आहे, हे विमा कंपनीने तपासून घ्यायला हवे. ‘माहिती लपवली’ हा आरोप कंपनीने सिद्ध करणे आवश्यक असते, ग्राहकावर ते लादता येत नाही. नेमक्या याच मुद्द्यावर राष्ट्रीय आयोगाने बोट ठेवत एका ग्राहकाला विम्याच्या रकमेसह दंडही ठोठावला. हेमामालिनी दर्भा आणि त्यांचे दिवंगत पती गंगाधर दर्भा यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये आयसीआयसीआय बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जापासून हे प्रकरण सुरू झाले. आयसीआयसीआय बँकेच्या शाखा व्यवस्थापकाने त्यांना सांगितले की, ’उच्च मूल्याचे ग्राहक’ म्हणून, त्यांना आयसीआयसीआय लोम्बार्डकडून ३ कोटी रुपयांच्या संपूर्ण गृहकर्ज रकमेसाठी मोफत विमा संरक्षण मिळेल. आयसीआयसीआय लोम्बार्डच्या प्रतिनिधीशी भेट होताच त्याने लगेचच रिकाम्या फॉर्मवर दर्भा यांची स्वाक्षरी घेतली आणि सांगितले की कर्जाच्या अर्जातून तपशील घेतला. ३.२२ कोटी रुपयांच्या मंजूर कर्जाच्या रकमेत २२.१० लाख रुपये विमा प्रीमियम समाविष्ट होते जे दर्भा कुटुंबाला मोफत वाटले.

आक्षेप घेतल्यावर, बँक व्यवस्थापक आणि आयसीआयसीआय लोम्बार्डच्या प्रतिनिधीने त्यांना आश्वासन दिले की प्रीमियम भरणे ही केवळ एक औपचारिकता आहे आणि नंतर ती रक्कम समायोजित केली जाईल, कारण विमा कंपनी आणि बँक दोन्ही आयसीआयसीआय समूहाचे होते. ’पहिल्या अर्जदाराला मोफत विमा’ कर्ज वितरणाच्या अटींमध्ये दिसून येईल. या आश्वासनांवर विश्वास ठेवून, त्यांनी पॉलिसीला मान्यता दिली, त्यानंतर फ्लॅटच्या विक्रेत्याला ३ कोटी रुपये आणि विमा कंपनीला २२.१० लाख रुपये देण्यात आले. पुढील वर्षभरात, त्यांनी समान मासिक हप्ते (एचख) भरत जवळजवळ अर्धे कर्ज फेडले आणि एकदा एकरकमी १ कोटी रुपये भरले. त्यामुळे ऑगस्ट २०१५ पर्यंत त्यांची एकूण परतफेड १.३१ कोटी रुपये झाली आणि सप्टेंबरपासून एचख २.३८ लाख रुपये झाला.दुर्दैवाने ११ सप्टेंबर २०१५ रोजी दर्भा कामावर असताना अचानक मेंदूमधील रक्तस्त्रावाने त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर दर्भा यांनी विमा दावा सादर केला. ज्यामध्ये २.९९ कोटी रुपयांची विमा रक्कम मागितली. मृत्यूचे कारण स्पष्ट असताना देखील विम्याचा क्लेम नाकारला गेला. स्वेच्छेने पतीचा वैद्यकीय इतिहास आणि रुग्णालयाच्या नोंदी देऊनही विमा कंपनीने दावा नाकारला. आयसीआयसीआय लोम्बार्ड यांनी दावा केला की मृत महिलेने प्रस्ताव फॉर्ममध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब, मूत्रपिंडाचा आजार आणि डायलिसिसचा इतिहास या आरोग्य समस्या दाखवल्या नाहीत. तथापि, दर्भा यांनी असा कोणताही खुलासा कधीही मागितला गेला नाही असे सांगितले. त्यांनी सांगितले की त्यांच्या पतीला आयसीआयसीआय बँकेच्या शाखेत रिकाम्या फॉर्मवर स्वाक्षरी करायला लावण्यात आली होती आणि त्यांना सांगितले होते की त्यांच्या कर्जाच्या अर्जात भरलेल्या माहितीवरून आवश्यक तपशील भरले जातील. त्यांनी पुढे सांगितले की त्यांना कधीही पॉलिसी पुस्तिका देण्यात आली नाही किंवा विमा योजनेच्या अटी आणि शर्तींची जाणीव करून देण्यात आली नाही. राष्ट्रीय आयोगाला प्रकरणाची तपासणी केल्यानंतर आणि दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतर, विमा कंपनी आणि बँकेकडून झालेल्या अनेक विसंगती आणि सेवेमध्ये कमतरता आढळल्या. प्रस्ताव फॉर्म खराब पद्धतीने भरलेला होता, लहान फॉन्ट, अस्पष्ट सूचना आणि वैद्यकीय इतिहासाबद्दलच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी पुरेशी जागा नव्हती असे निरीक्षण नोंदवले.खंडपीठाने कॉन्ट्राप्रोफेरेंटम नियमाचा हवाला दिला. जेव्हा कराराची कलमे खरोखरच अस्पष्ट असतात फक्त तेव्हाच हा नियम लागू होतो. म्हणजेच त्याचा अर्थ अनेक प्रकारे वाजवीपणे लावता येतो. हा सिद्धांत बहुतेकदा करारातील कमकुवत पक्षाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी लागू केला जातो. खंडपीठाने असे म्हटले की विमा कंपनीविरुद्ध अशा अस्पष्टतेचा अर्थ लावला पाहिजे. आयसीआयसीआय लोम्बार्डने कधीही उच्च विमा रकमेची पॉलिसी जारी करण्यापूर्वी वैद्यकीय तपासणीचा आग्रह धरला नाही आणि त्याऐवजी केवळ मृत व्यक्तीने भरलेल्या कथित अस्पष्ट प्रस्ताव फॉर्मवर अवलंबून राहिले. शिवाय हेतू फसवण्याचा होता हे सिद्ध करणे विमा कंपनीची जबाबदारी आहे आणि केवळ माहिती दिली नाही म्हणून क्लेम नाकारणे चुकीचे आहे. हा मुद्दा सुप्रीम कोर्टाच्या वेगळ्या निर्णयानुसार सिद्ध झालेला आहे.राष्ट्रीय आयोगाचे अध्यक्ष सुभाष चंद्रा आणि सदस्य एअर व्हाइस-मार्शल (एव्हीएम) जे राजेंद्र (निवृत्त) यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, ‘तक्रार अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्सने तक्रारदाराला गृह कर्ज विमा पॉलिसी अंतर्गत देय रक्कम ८ फेब्रुवारी २०१६ रोजी दावा फेटाळल्याच्या तारखेपासून अंतिम पेमेंटच्या तारखेपर्यंत ७% वार्षिक साध्या व्याजासह, या आदेशाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत द्यावे. विलंब झाल्यास, लागू होणारा व्याजदर १०% वार्षिक असेल. आयसीआयसीआय बँकेला या आदेशाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत तक्रारदाराला फ्लॅटची सर्व मूळ कागदपत्रे परत करावी. विलंब झाल्यास, कर्जदाता तक्रारदाराला प्रतिदिन ५,००० रुपये खर्च द्यावे लागेल. याशिवाय तक्रारदाराला खटल्याचा खर्च म्हणून ५०,००० रुपये देण्याचे निर्देश देण्यात आले आहे.’आयोगाच्या निर्णयातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे प्रणालीतील त्रुटींवर प्रकाश टाकतो:बँकेचा चुकीचा फॉर्म, अस्पष्ट माहिती ग्राहकांच्या अज्ञानाचा गैरफायदा

बँकिंग व विमा व्यवहार म्हणजे केवळ आर्थिक नाही तर ते विश्वासाचे व्यवहार आहेत.जर एखादी बँक फॉर्म भरताना चुकीची माहिती देत असेल आणि नंतर त्याच माहितीवर क्लेम नाकारला जात असेल, तर ही व्यवस्थात्मक फसवणूक आहे.

प्रामाणिक ग्राहकाच्या पाठीशी व्यवस्था उभी राहते का? हा प्रश्नच या प्रकरणाचे केंद्रबिंदू आहे.प्रामाणिक ग्राहकांना अशा प्रसंगी न्याय मिळालाच पाहिजे. हा निर्णय त्याच न्यायाचा आवाज आहे. कर्ज प्रक्रियेत असलेल्या प्रत्येक सेवा बँक, विमा, प्रतिनिधी यांनी जबाबदारीने आणि पारदर्शकतेने माहिती द्यावी. व्यवस्था प्रामाणिक ग्राहकांच्या बाजूने ठाम भूमिका घेते.

# ‘स्थानिक’ निवडणुकांचे बिगुल



शिमगा गेला अन् उरले कवित्व याच धर्तीवर कोरोना गेला तरी निवडणुका होईना, अशी परिस्थिती महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये २०२० पासून सुरू आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकांचा अपवाद वगळता महाराष्ट्रामध्ये मागील साडेपाच वर्षांमध्ये कोणत्याही प्रकारच्या निवडणुका झालेल्या नाहीत. सत्तेशिवाय राजकीय घटक जगूच शकत नाही, असे राजकारणामध्ये उपहासाने म्हटले जाते. राजकीय जीवनात कार्यरत असणाऱ्या प्रत्येकालाच निवडणुकीचे आकर्षण असते. निवडणूक लढविण्याची महत्त्वाकांक्षा असते. निवडणुकीच्या माध्यमातूनच सत्तेची फळे चाखावयास मिळत असल्याने निवडणूक लढवू इच्छिणारा पाच वर्षे त्यासाठीच मोर्चेबांधणी करतो. घराकडे दुर्लक्ष करून जनसामान्यांचे हित जोपासण्याचे, त्यांच्या गळ्यातील ताईत होण्यासाठी धडपडतो. जेणेकरून त्यांच्या मनामध्ये आपल्याविषयी एक चांगली प्रतिमा निर्माण व्हावी आणि त्यातूनच त्यांचे प्रेम मतपेटीच्या माध्यमातून मतदानात रूपांतरित व्हावे, हाच त्यामागील एककलमी उद्देश असतो. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ओबीसी आरक्षणामुळे न्यायालयीन प्रक्रियेत अडकल्या होत्या. सुरुवातीला दोन-अडीच वर्षांचा काळ कोरोना महामारीमुळे गेला. कोरोना काळात जगण्यासाठीचा संघर्ष महत्त्वाचा असल्याने निवडणुका होणे शक्यच नव्हते. त्यानंतर ओबीसी आरक्षणावरून न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाल्याने निवडणुकांना विलंब झाला. राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर व्हाव्यात यासाठी निवडणुका लढवू पाहणाऱ्या इच्छुकांनी गेल्या काही महिन्यांपासून जणू काही आपल्या घरातील देवच पाण्यात ठेवले होते; परंतु न्यायालयीन प्रक्रियेस विलंब होत गेल्याने, सुनावणीदरम्यान ‘तारीख पे तारीख’ पडत गेल्याने निवडणुका तब्बल पाच ते साडेपाच वर्षे लांबणीवर पडल्या.कोरोना रुग्ण सोसायटीमध्ये आढळल्यावर प्रशासनाकडून सॅनिटायझेशन होण्यापूर्वीच राजकीय घटकांनी ते काम प्रामाणिकपणे पार पाडलेले असायचे. सोसायटीच्या प्रवेशद्वारावरच फळांच्या, भाज्यांच्या गाड्या उपलब्ध असायच्या. घरात कोरोना रुग्ण आढळल्यास त्या घरामध्ये दूध, भाज्या पोहोचविण्याचे कामही झटपट होत असे. पक्षीय मतभेद विसरून सर्वजण समाजसेवा या एकमेव ध्येयाने झपाटल्यागत कार्यरत होते. अखेरीला निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वीच निकाल जाहीर केल्याने प्रभागरचना, ओबीसी आरक्षण आदी सर्व चित्र स्पष्ट झाले आहे. निकालानंतर लगेचच दिवाळीनंतर निवडणुकांचे ‘बिगुल’ वाजणार असल्याचे चित्र स्पष्ट होताच इच्छुक मंडळींच्या व त्यांच्या पक्षांच्या मोर्चेबांधणीला पुन्हा वेग आला आहे. विधानसभा, लोकसभा मतदारसंघावर वर्चस्व प्रस्थापित करायचे असेल अथवा असलेले वर्चस्व राखायचे असेल, तर स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात असणे आवश्यक असते. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिकांवर वर्चस्व असले, त्या त्या सभागृहांमध्ये आपल्या पक्षांचे अधिक सदस्य असले आणि त्या सदस्यांमध्ये सर्वाधिक आपले समर्थक व कार्यकर्ते असल्यावर लोकसभा व विधानसभा मतदारसंघ राखणे व जिंकणे अवघड जात नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुती व महाविकास आघाडीमध्येच होणार आहेत. महायुतीच्या तुलनेत महाविकास आघाडीत तुलनेने कमकुवत असल्याने तसेच बदलत्या राजकीय प्रवाहात महाविकास आघाडीच्याच अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. राज्यातील काही ग्रामीण भागांचा अपवाद वगळल्यास अन्य सर्वत्रच राष्ट्रवादीच्या तुलनेत भाजप व शिवसेना प्रभावशाली आहे. भाजपला मुंबई महापालिकेवर आजतागायत कधीही एकहाती सत्ता मिळालेली नाही. शिवसेनेच्या साथीने उपमहापौर व अन्य विषय समित्यांच्या सभापती पदावरच भाजपला समाधान मानावे लागलेले आहे. मुंबई महापालिका कार्यक्षेत्राचा विचार करावयाचा झाल्यास महायुतीचे पारडे वरचढ आहे.महाविकास आघाडीमध्ये उबाठा सेना वगळल्यास शरद पवार गटाची राष्ट्रवादी आणि काँग्रेसची परिस्थिती अवघड आहे. महायुतीमध्ये भाजपने स्वबळावर सत्ता आणण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून मुंबई शहर आणि उपनगरामध्ये कंबर कसली आहे, तरीही महायुतीमध्ये दोस्तीत कुस्ती न करता महायुती म्हणूनच दिल्लीश्वरांकडून सूचना आल्याने महायुती राज्यामध्ये या निवडणुकांना एकत्रित सामोरे जाणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. भाजपला एकहाती सत्ता मिळविण्यामध्ये खरा अडथळा हा शिवसेनेचाच आहे. मुंबई महापालिकेतील जवळपास ११५ माजी नगरसेवकांचा शिवसेनेत समावेश आहे. भाजपचे नवी मुंबई, पनवेलमध्ये प्राबल्य आहे. नवी मुंबईतही मुंबईसारखेच राजकीय चित्र आहे. नवी मुंबईत स्वबळावर सत्ता आणण्यासाठी भाजपला महाविकास आघाडीऐवजी शिवसेनेचाच अडथळा असणार आहे. त्यामुळे भाजपला त्या ठिकाणी शिवसेनेशी तडजोड करावी लागण्याची शक्यता आहे. ठाणे, कल्याण-डोंबिवली तसेच ठाण्याच्या अन्य ग्रामीण भागामध्ये शिवसेनेचे प्राबल्य आहे. मतविभागणीचा लाभ मविआच्या उमेदवाराला मिळू नये म्हणून महायुती एकत्रितपणेच निवडणुकांना सामोरे जाणार आहे. बुधवारी दिल्ली दौऱ्यामध्ये शिवसेनेचे प्रमुख नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीदरम्यान महायुतीबाबत स्थानिक निवडणुकांबाबतचे चित्र स्पष्ट केल्याचे बोलले जाते. निवडणुका जानेवारीत होणार असल्याचे बोलले जात असल्याने राजकीय चित्र ढवळून निघणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# सरला बेट विकास आराखडा व शनि देवगाव येथील बंधाऱ्यास मंजूरी देणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

सद्गुरु संत गंगागिरी महाराजांच्या अध्यात्मिक परंपरेचा वारसा लाभलेल्या या भागातील भाविक नागरिकांच्या विकासाठी देवगाव शनि येथील उच्च पातळी बंधारा बांधकाम व सरला बेट विकास आराखडा यांना मंजूरी देऊ, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी देवगाव शनि येथे दिले.देवगाव शनि ता. वैजापूर येथे सद्गुरु संत गंगागिरी महाराज यांच्या १७८ व्या अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाची सांगता बुधवारी झाली. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री (गोदावरी, कृष्णा खोरे) राधाकृष्ण विखे पाटील, संत रामगिरी महाराज, जलसंपदा मंत्री (तापी, विदर्भ, कोकण) गिरीश महाजन, आ. रमेश बोरनारे, आ. विठ्ठल लंघे, सुरेश चव्हाणके, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र,पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच अन्य अध्यात्मिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईतून येतांना समुद्राचे दर्शन होते त्याप्रमाणे इथे आल्यावर भाविकांच्या सागराचे दर्शन झाले. १७८ वर्षांची परंपरा असलेला हा अध्यात्मिक सोहळा, भाविकांची शिस्त, तत्परता, त्यांची भाविकता हे सगळं मनाला विलक्षण आनंद देणारे आहे. देशहिताच्या विचाराला मारक असणाऱ्या शक्ती उदयास येतात तेव्हा हे सांस्कृतिक आक्रमण थोपविण्यासाठी संत शक्ती मैदानात उतरते. संतांच्या विचारांचे महत्त्व त्याचमुळे अबाधित आहे.याच विचारांनी छत्रपती शिवाजी महाराजांची रयतेचे स्वराज्य मिळविले. अध्यात्माच्या शक्तीमुळे सकारात्मक उर्जा निर्माण होते आणि मला सकारात्मक कार्याची प्रेरणा मिळते.या भागातील सरला बेटाचा विकास




करण्यासाठी १०९ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. हा आराखडा लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी मान्यता देण्यात येईल. तसेच देवगाव शनि येथील उच्च पातळी बंधाऱ्याची मागणीही आम्ही लवकरच पूर्ण करु असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. तसेच या सोहळ्याला दरवर्षी येईन असेही आश्वासन दिले.

मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, वारकरी संप्रदायाने जगाला विशाल दृष्टीकोन दिला.हीच आपली खरी संस्कृती आहे. संत गंगागिरी महाराजांच्या या पवित्र स्थानावर होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी १ एकर जागेवर मोठे सभागृह बांधण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.मंत्री विखे पाटील म्हणाले की, याभागातील उच्च पातळी बंधारा बांधकामाच्या मागणीला मी दुजोरा देतो. या भागातील या क्षेत्राचा विकास करण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. याभागातील अध्यात्मिक चळवळ ही आम्हा सगळ्यांना मार्गदर्शक आहे.१७८ वर्षाची परंपरा असलेल्या या अखंड हरिनाम सप्ताहाचा आज सांगता सोहळा अर्थात काल्याचे कीर्तन होते. त्यास मुख्यमंत्र्यांसह अनेक मान्यरांनी हजेरी लावली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. कार्यक्रमात सुरुवातीला आलेल्या मान्यवरांचे सप्ताह समितीतर्फे सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांसह अन्य मंत्री महोदय व मान्यवरांनी फुगडी खेळून सांगता सोहळ्याचा आनंद लुटला.

## ठाणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी तातडीने दूर करा-एकनाथ शिंदे

### खड्डे मुक्तीसाठी उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरावे



**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे आणि परिसरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिक अतिशय त्रस्त झाले आहेत. सर्व यंत्रणांनी समन्वय साधून हा परिसर वाहतूक कोंडी मुक्त करावा. तसेच, रस्ते तातडीने दुरुस्त करून खड्डे मुक्तीसाठी उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यात येत असलेल्या अपयशाबद्दल स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली. ठाण्यात कोपरी, माजिवडा यासोबत घोडबंदर रस्ता, गायमुख घाट ते फाउंटन हॉटेल, शिळफाटा परिसर येथे सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. त्याबद्दलच्या तक्रारी वारंवार येत असून सर्व यंत्रणांनी समन्वय साधून हा पूर्ण परिसर वाहतूक कोंडी मुक्त करावा असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी झालेल्या बैठकीत दिले. या बैठकीस ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट आदी अधिकारी उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे यांना दुरध्वनीव्दारे सूचना दिल्या. गायमुख घाटातील रस्त्यामुळे वाहतूक कोंडी सातत्याने होत असून या समस्येवर अजूनही तोडगा काढण्यात यश आलेले नाही याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. वाहतुकीचे व्यवस्थित नियोजन करून ठाणे, भिवंडी, शिळफाटा आणि कोपरी या चारही भागातील वाहतूक कोंडीवर मात करावी. रस्ते दुरुस्ती करताना त्या कामाचा दर्जा चांगला असावा. रस्त्यावर दुरुस्तीचे उंचवटे तयार होऊ नयेत. त्याने अपघात होतात, याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. खड्डे मुक्ती झाल्यास वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. त्यामुळे उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरून खड्डे मुक्ती करावी, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

## जलजीवन मिशनमधील प्रलंबित कामांचा अहवाल सादर करा-पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील



**शिर्डी । प्रतिनिधी**

जलजीवन मिशन व ग्रामीण पाणीपुरवठा योजनेंतर्गत सुरू असलेल्या प्रलंबित कामांचा अहवाल चालू महिनाअखेर सादर करावा, अशा सूचना जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. योजनेतील त्रुटी दूर करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष योजनांची पाहणी करावी, तसेच कामामुळे निर्माण झालेल्या रस्त्यांच्या प्रश्नांबाबत उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.राहाता पंचायत समिती सभागृहात झालेल्या बैठकीत जलजीवन मिशन व जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा योजनांच्या आढावाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राहाता, श्रीरामपूर, संगमनेर, राहुरी, तालुक्यातील कामांचा आढावा घेण्यात आला. या वेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जलजीवन मिशनच्या अधीक्षक अभियंता सुनंदा नरवाडे, ग्रामीण पाणीपुरवठाचे कार्यकारी अभियंते गणेश भोगावडे, हितेंद्र चव्हाण, गटविकास अधिकारी विवेक गुंड आदी उपस्थित होते.मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, पाइपलाइन टाकताना रस्त्यांचे नुकसान झाले असून, तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात यावे. लोणी बुद्रुक व लोणी खुर्द येथील योजना ऑक्टोबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. ममदापूर येथील टाक्या व वाकडी येथील पाइपलाइनचे काम पर्यायी मार्गाने पूर्ण करावे. रस्ते खोदल्यानंतर माती उघड्यावर पडू नये यासाठी आवश्यक दक्षता घ्यावी.धनगरवाडी येथील कामे तात्काळ पूर्ण करावीत. कडीत येथील जुन्या योजनांतील साचलेली घाण त्वरित काढावी. उन्हात पडून खराब झालेल्या पाइपलाइनच्या दुरुस्तीसाठी कार्यवाही करावी. सोनगाव योजनेसाठी आवश्यक जागा उपलब्ध करण्यासाठी महसूल व ग्रामविकास यंत्रणांमध्ये समन्वय ठेवावा. पाइपलाइनसाठी डांबरी रस्त्यांचे खोदकाम टाळावे. जिथे रस्ते खणण्यात आले आहेत, तेथील माहिती संकलित करून अहवाल सादर करावा.निमगाव जाळी योजनेसाठी महसूल विभागामार्फत जागा उपलब्ध करण्याची कार्यवाही करण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले.या बैठकीत दाढ बुद्रुक, कोल्हेवाडी, शिंगवे, पिंपळवाडी-नपावाडी, कोर्हाडे वाळकी, खडकेवाके, डोऱ्हाळे, साकुरी, पुणतांबा तसेच जिल्हा परिषद योजनांमधील सावळीविहीर बुद्रुक, अस्तगाव, नांदुर्खी, पिंपरी निर्मळ, बाभळेश्वर, चितळी, जळगाव आणि संगमनेर तालुक्यातील आश्वी व चिंचोली या गावांतील कामांचा आढावा घेण्यात आला.योजनेची कामे पूर्ण करताना संबंधित ठेकेदारांनी शासकीय यंत्रणांना विश्वासात न घेतल्याने गावातील रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यास जबाबदार असणाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाईल. या संदर्भात लवकरच जिल्हाधिकारी व विभागीय वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत लवकरच बैठक घेणार आहात, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

## भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल मध्ये रंगली संगीत सभा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भारतीय संगीत जगातील सर्वश्रेष्ठ संगीत आहे. या संगीतामध्ये आत्मिकशुद्धतेचीही क्षमता आहे. अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संचलित भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये सन २०१९ मध्ये म्युझिकल अकॅडमीची स्थापना झाली. ती अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाशी संलग्न आहे. ही अकॅडमी विद्यार्थ्यांना केवल अभिजात शास्त्रीय संगीतचे सखोल आणि शिस्तबद्ध शिक्षण देत नाही, तर त्यांच्या वादन कलेत आणि आत्मिक शुद्धतेतही भर घालत असल्याचे प्रतिपादन ख्यातनाम संगीत शिक्षक कल्याण मुरकुटे यांनी केले.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संचलित भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये विशेष संगीत सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संगीत शिक्षक मुरकुटे हे बोलत होते. विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. दीप प्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संगीत विभाग प्रमुख परशुराम मुळे यांनी प्रास्तावित केले. पाहुण्यांचा परिचय कु. राजनंदिनी जाधव हिने करून दिला.भारतीय संगीत ऐकल्याने आपल्या मनावरील ताण हलका होतो. मन प्रसन्न होते. भारतीय संगीत व पाश्चात्त्य संगीत यामधील फरक कल्याण मुरकुटे यांनी प्रत्यक्ष आपल्या गायनातून मुलांना करून दिला. यावेळी विद्यार्थ्यांना संगीत क्षेत्रातील रागाबद्दल माहिती देण्यात आली. विद्यार्थी कौशिक नातू, आरोही अनारसे, श्रुतिका दरेकर, गौरव भुकन यांनी अनुक्रमे राग बागेश्री, राग काफी, केदार, पुरिया धनश्री यांचे सादरीकरण अतिशय सुंदर रित्या करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी हार्मोनियमवर साथ परशुराम मुळे तर तबल्याची साथ विकास साबळे, तानपुरा साथ प्राची पवार, व श्रेया पांडव यांनी दिली.या कार्यक्रमाप्रसंगी ह.भ.प. रामचंद्र महाराज दरेकर, लक्ष्मण महाराज शास्त्री, संतोष दाणे, पवन नाईक, राम शिंदे, संतोष कुलट, शैला शिवगुंडे, विद्यालयाचे उपप्राचार्य कैलास साबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब व्हावळ, कल्पना पाठक, वैभव कुलकर्णी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अक्षरा फुलसौंदर हिने केले. आभार अध्यापिका शितल डिंमळे यांनी मानले.

## अमित ढोरसकर यांची अहिल्यानगर ते अक्कलकोट सायकल वारी पूर्ण



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

केडगाव मोहिनीनगर येथील रहिवासी स्वामींभक्त अमित ढोरसकर यांनी नगर ते अक्कलकोट हे सुमारे ३०० किलोमीटर अंतर सायकलवरून पूर्ण केले. एक प्रेरणादायी कामगिरी करत त्यांनी सायकलीवर अवघ्या ४८ तासांमध्ये हे अंतर कापले आहे.

या प्रवासात त्यांनी केवळ शारीरिक क्षमतेचे नव्हे तर मानसिक ताकतीचे देखील दर्शन घडवले. अक्कलकोट वारीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हा प्रवास पूर्ण करत एक सामाजिक आणि आरोग्याचा संदेश दिला आहे. या प्रवासाचे वैशिष्ट्ये म्हणजे केडगाव येथील रेणुका माता मंदिर येथून ही सायकलवारी सुरु करण्यात आली. तर अक्कलकोट येथील स्वामींचे मंदिर येथे थांबली. ढोरसकर यांनी ही सायकलवारी करुन निरोगी आरोग्य व प्रदुषणमुक्तीसाठी सायकल वापरण्याचा संदेश दिला. त्यांनी केलेली सायकलवारी परिसरातील सर्वांसाठी ऊर्जास्त्रोत ठरत आहे. तसेच त्यांचा पुढील प्रवास उज्जेन येथे असणार आहे व नंतर साई पालखी सोहळ्यात पायी दिंडीत ते सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या पुढील वाटचालीस साई सेवा मंडळ व केडगाव ग्रामस्थांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## बँकांनी लाभार्थ्यांची कर्ज मंजुरीची प्रकरणे वेळेत मार्गी लावावीत-महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

मराठा समाजातील नवउद्योजकांना चालना देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे कर्ज प्रस्ताव बँकांनी सुलभ पद्धतीने व विहित कालावधीत मार्गी लावावेत, असे निर्देश महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी दिले.

महामंडळाच्या योजनांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात बैठक घेण्यात आली. त्यावेळी श्री. पाटील बोलत होते.




बैठकीस उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी आशिष नवले, महामंडळाच्या विभागीय समन्वयक पल्लवी मोरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक केंद्राचे सहायक आयुक्त रविकुमार पंतम, जिल्हा समन्वयक अमोल बोथे,कौशल्य विकास अधिकारी शुभदा पाठक, अनिल मोहिते, दिलीप भालसिंग व विविध बँकांचे अधिकारी उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले, की महामंडळाच्या योजनांद्वारे राज्यातील १ लाख ५० हजार लाभार्थ्यांना उद्योगासाठी १२,६०० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले असून, १,२२२ कोटी रुपयांचा व्याज परतावा देण्यात आला आहे. जिल्ह्यातील १८ हजार लाभार्थ्यांना राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांमार्फत १,३४० कोटींचे कर्ज व १२३ कोटी रुपयांचा व्याज परतावा मिळाला आहे.

महामंडळामार्फत प्रामुख्याने मराठा समाजासाठी, तसेच ज्या प्रवर्गासाठी स्वतंत्र महामंडळ अस्तित्वात नाही अशा घटकांसाठी स्वयंरोजगारासाठी कर्ज व्याज परतावा योजना राबवली जाते. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट प्रकल्प व्याज परतावा योजना या शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजना असून, समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत या योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी त्यांचा व्यापक प्रचार-प्रसार होणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

बँकांनी योजनेचे स्वरूप समजून घेऊन कर्जवाटपाचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण होईल, यासाठी प्रयत्न करावेत. पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात कोणताही विलंब होऊ नये. प्रस्तावात त्रुटी असल्यास त्यांचे तात्काळ निराकरण करावे व विनाकारण प्रलंबित प्रस्ताव थांबवू नयेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीदरम्यान श्री. पाटील यांनी बँक अधिकाऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच ज्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, त्यांच्या समस्या समजून घेत त्या सोडवण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना केल्या.

# जागतिक आदिवासी दिन:आत्मसन्मान व अस्मिता टिकवणे हाच खरा उद्देश

**मोलगी । रविंद्र वळवी**

भारतात ९ ऑगस्ट हा क्रांती दिवस साजरा होत असला तरी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घोषणेनुसार जगभरातील आदिवासी बांधव मात्र हा दिवस 'विश्व आदिवासी 'दिवस' म्हणून साजरा करीत आहे. हा दिवस मनवण्यामागे युनोचा व्यापक उद्देश राहिला. त्यात जगभरातील आदिवासींच्या मानवी अधिकाराचे संरक्षण व्हावे, जल, जंगल व जमिनीवरील अधिकार अबाधित राहावा, त्यांची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, स्वतंत्र ओळख व अस्तित्वाला कुठल्याही धोका निर्माण होणार नाही एव्हेच नव्हे तर, आदिवासींचा आत्मसन्मान व अस्मिता टिकवणे असा उद्देश राहिला आहे. त्यामुळे धरती आबा बिरसा मुंडा यांच्या एकाचवेळी सर्व क्षेत्रात क्रांती घडविणाऱ्या उलगुलान उठावानंतर भारतात 'विश्व आदिवासी दिवसा' मुळे आदिवासींमध्ये सर्वांगाने उमीद  निर्माण होत आहे.

२३ डिसेंबर १९९४ ला युनोच्या आमसभेच्या बैठकीत अत्यंत महत्त्वपूर्ण ठराव पारित करण्यात आला, तो म्हणजे दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिवस म्हणून साजरा करण्यात यावा. हाच दिवस निश्चित करण्याचे कारण म्हणजे १९८२ या वर्षाच्या या तारखेला जिनिव्हा येथे आदिवासी जनतेच्या मानवी हकाचे संरक्षण व वाहीसाठी काम करण्याच्या बैठक झाली होती. त्या दिवसाची आठवण म्हणून १ ऑगस्ट हा आदिवासी दिवस म्हणून साजरा करण्याचे ठरले. युनोच्या आमसभेने हेही तात्काळ घोषित करून टाकले की, १९९४ ते २००५ हे दशक आदिवासी दशक म्हणून साजरे करण्यात येईल. पहिले आदिवासी दशक संपत नाही, तोच २२ डिसेंबर २००४ रोजी युनोने दुसरे आदिवासी दशक म्हणून साजरे करण्याचे ठरविले. आदिवासी समुदायाची संस्कृती, शिक्षण, आरोग्य, मानवाधिकार, पर्यावरण आर्थिक आणि सामाजिक विकासासंदर्भात जे प्रश्न आहेत, ते आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्पर सहकायनि सोडविण्यासाठी प्रयत्न करणे हा या आदिवासी दशकांमागील उद्देश होता. त्याची दखल इतिहासात नाही.  हिंदुस्थानावर ज्या-ज्या वेळी परकीय आक्रमणे झाली, त्या-त्या वेळी येथील आदिवासी जमातींनी त्यांना अत्यंत प्रखरपणे विरोध केला. ब्रिटिशांविरुद्ध लढताना स्वातंत्र्य लक्ष्यात सहभागी झालेल्या आदिवासी क्रांतिकारकांची संख्या फार मोठी आहे, पण इतिहासात  उपेक्षित राहिले. काहींनी आपल्या धर्म-संस्कृतीवर होणारे परकियांचे  आदिवासींनी शंभरपेक्षाही अधिक लहान मोठे सशस्त्र संघर्ष केले. या संघर्षामध्ये अनेक आदिवासी वीर हुतात्मा झाले. इ.स. १७८५ बिहारमध्ये तिलका मांझी हर ब्रिटिशाविरुद्ध संघर्ष करून फासावर




गेला. तेव्हापासून आदिवासींच्या लक्ष्याचा धगधगता इतिहास सुरू आहे. हिंदुस्थानात स्वकियांच्या आणि परकियांच्या राजवटी आल्या यवनांची साम्राज्ये आली आणि गेली मात्र, त्यांनी आदिवासी जमातींचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले. कालांतराने आदिवासी संस्थाने खालसा करायला सुरुवात झाली. जंगलखाते निर्माण करून तेथे स्वतःचा सर्वतोपरी अधिकार सुरू केला. त्याचा परिणाम आदिवासींच्या पारंपरिक जीवनावर झाला आणि त्याचा परिणाम म्हणून १४५० पासून तर स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत निरनिराळ्या प्रदेशातील आदिवासी वीरांनी स्वातंत्र्यासाठी उठाव केले, चळवळी केल्या, ब्रिटिशांशी संघर्ष केले, पण संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्यगटाची पहिली एक ठराव संमत करून वर्ष २००५-२०१३ हे कामकाज पाहिले. यावेळी तत्व भेटवस्तू देण्यात आल आदिवासींमध्ये अस्मिता जागवणारा 'विश्व आदिवासी दिवस'आक्रमण थोपविण्यासाठी उठाव केले, तर काहींनी शोषणाविरुद्ध, विषमतेविरुद्ध स पाडून मिळणारा भूतलावरील अपरिमित, निरपेक्ष उभारले. ज्या-ज्या वेळी जंगल-पहाडातील आदिवासी जमातीचे स्वातंत्र्य, अस्तित्व दिसतो. तरीही केवळ भौतिक सुखाचे चमे अस्मिता, संस्कृती धोक्यात आली, त्या त्या वेळी भारतातील आदिवासींनी उठाव केले. ब्रिटिशांना सर्वप्रथम येथील आदिवासी जमातीशीच लढा द्यावा लागला. भारताच्या निरनिराळ्या भागात इंग्रजांविरुद्ध झालेल्या भात आदिवासी क्रांतिकारकांचे योगदान राहिले आहे. वैश्विक मानवजातीच्या प्रारंभिक प्रत्र उपस्थित होत आहे. अवस्थेतील मानवी जीवनसमूह अवशेष आदिवासी या भूमीवरचे मूलनिवासी म्हणून आदिवासीकडे बघावे लागेल. त्यांची संस्कृती ही सर्व संस्कृतीची मूलस्रोत आहे. म्हणून तर स्त्री-पुरुष समानता सिनात्रयांना प्रधान स्थान, मातृसत्ताक पद्धती, प्राणिप्रेम, सहकार्यांची भावना, समूहनिष्ठा, स्वातंत्र्य- समता बंधुता, माणुसकी, अल्पसंतुष्ट वृत्ती, धर्मनिरपेक्षता, चराचराकडे समदृष्टीने पाहण्याची वृत्ती, निसर्गाशी घट्टपणाने टिकविलेले नाते ही मानवी मूल्ये या संस्कृतीत आजही तितक्याच जीवट अवलंबिली जाताना दिसतात. त्यांच्या आणि अस्मिता जागर करणारा ठरत आहे. विधिविधानांतून, सणोत्सवांतून, देवतविधींतून,नृत्यगाण्यांतून, संगीतातून निसगांशी तादात्म्य आनंद त्यांच्या जीवनात ओतप्रोत भरलेला घालणाऱ्या नागर लोकांच्या दृष्टिकोनातून मानवी जीवन संस्कृतीचे हे मूलस्रोत मागास ठरतात? खरेतर पुन्हा एकदा आजच्या बदललेल्या परिस्थितीत याच मूल्यांची कास धरणाऱ्या या आदिम संस्कृतीचा संपन्न वारसा जोपसण्याची आणि अवलंबिण्याची गरज नाही का? असा

जल-जंगल-जमिनीवर त्यांचा अधिकार, प्राचीन भाषा, प्राचीन संस्कृती, प्राचीन कला आदिवासींच्या पण, आज आदिवासींचे अस्तित्वच संपवण्याचे षडयंत्र सर्वच बाजूंनी रचले जात आहे. क्रांतिसूर्य बिरसा मुंडाच्या मंउलगुलानफ या हाकेने आदिवासी जागृत झालाय, एकसंध झालाय म्हणूनच आदिवासींच्या हक्काचा जागतिक आदिवासी दिवस त्यांचा आत्मसन्मान जागविणारा

## सह दुय्यम निबंधक कार्यालया मध्ये महसुल सप्ताहाचे आयोजन

### सह दुय्यम निबंधक कार्यालया समोर वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वतीने केज तालुका कार्यालयात दि.१ ते ७ आगष्ट कालावधी दरम्यान महसूल सप्ताह आयोजीत करण्यात आला.शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी विशेष माहिती सह दुय्यम निबंधक श्रीमती एस. के.परदेशी व कनिष्ठ लिपिक श्री.समिर शेख यांनी पक्षकारांना मार्गदर्शन केले.सलोखा योजना,जमीन अदला बदल पत्र इत्यादी सुविधा प्रदान करण्यात आल्या.या सप्ताह काळात मुद्रांक विक्रेते श्री.उत्तम थोरात,वचिष्ट  घोळवे,श्रीराम शेटे, हारुण कुरेशी,खाजा शेख,अजिज शेख, मोहन चाटे,भगवान जमाले,किसन महाजन अनंत सिरसट,गणेश आरकडे तसेच लेखनीक भिमराव लोंढे,रामभाऊ धनवडे, आश्रुबा रांजणकर, तसेच अड व्ही.एम मुंडे, अड.बी.जे.गुंडरे,पप्पु वाघमारे, जोशी, हिराचंद काळे,धैर्यशील देशमुख आदी उपस्थित होते.



## ग्रामसेवक कॉलनी केज येथील ओपन स्पेस मधील अतिक्रमणे तात्काळ काढा-प्रा.ईश्वर मुंडे

**केज । प्रतिनिधी**

प्लॉटींग करणे व खोटे नाटे कागदपत्रे तयार करून ओपन स्पेस विकण्याचा गोरख धंदा बीड जिल्ह्यात चालू आहे.या बाबतचा तारांकित प्रश्न बीड चे आ.संदीप क्षीरसागर यांनी नुकत्याच झालेल्या विधानसभा अधिवेशनात उचलून धरला होता.शासनाने त्या बाबत एक चौकशी समीती नेमली आहे. असाच प्रकार केज येथे ही होत आहेत.बीड जिल्ह्यातील सर्वाधिक रेडी रेकनर शासन दर असलेली व कलेक्टर बीड मंजूर एन.ए.तसेच टाऊन प्लॅनर,बीड मंजूर ले-आऊट असलेली जिल्हापरिषद कर्मचारी यांची ग्राम सेवक कॉलनी श्री दत्त गृह निर्माण सहकारी सोसायटी,केज च्या ओपन स्पेस वर




सध्या भू माफीयांची नजर पडलेली असून अतिक्रमणे करून फसवेगिरीने विक्री करणे चालू आहे.

सदरील अतिक्रमणे तात्काळ काढावेत अन्यथा तेथील रहीवाशांना सोबत घेऊन दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी तहसील कार्यालय केज येथे निदर्शने केली जातील असे लेखी निवेदन प्रा.ईश्वर मुंडे व इतरांनी तहसीलदार केज, मुख्याधिकारी,नगर पंचायत,केज व तालुका निरीक्षक,भूमीअभिलेख,केज यांना दि.२१ जुलै २०२५ रोजी दिले होते.

ओपन स्पेस चे भूखंड सांभाळणे व त्याचा सार्वजनिक वापरासाठी विकास करणे शासनाचे कर्तव्य आहे.याविषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन  तहसीलदार केज यांनी जाय मोक्यावर जाऊन पंचनामा करून अतिक्रमणे काढून भू माफियांना चपराक देणे आवश्यक होते.

परंतू तसे न करता फक्त मुख्याधिकारी,नगर पंचायत,केज यांना दि.३० जुलै २०२५ रोजी कार्यवाही करणे बाबतचे पत्र पाठवून आपल्या अंगावरचे घोंगडं झटकण्याचे  काम तहसीलदार केज यांनी केले आहे.

यावर आपले समाधान नसून अतिक्रमणे काढले नाहीत तर आपण आपल्या आंदोलन करण्याच्या भुमिकेवर ठाम असल्याचे प्रा.ईश्वर मुंडे व इतरांनी माध्यम प्रतिनिधींना सांगीतले आहे.

## आरोग्य धमनी मॉडेलचे राष्ट्रीय स्तरावर सादरीकरण

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार, ७ ऑगस्ट २०२५ – संपूर्ण देशातील निवडक जिल्ह्यांमध्ये स्थान मिळवत नंदुरबार जिल्ह्याने विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे आयोजित 'राष्ट्रीय आदर्श प्रथा परिसंवाद' या विशेष सत्रात आपली सर्वोत्तम कार्यपद्धती सादर करण्याचा मान मिळवला.

आरोग्य व पोषण या विषयावर केंद्रित सत्रात जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी जिल्ह्याचा नाविन्यपूर्ण व पथदर्शी आरोग्य धमनी मॉडेल सादर केले. हे मॉडेल आदिवासी भागातील आरोग्य सुविधा पोहोचविणे, कुपोषण निर्मूलन आणि प्रतिबंधात्मक आरोग्य उपक्रम बळकट करण्यासाठी प्रभावी ठरले आहे.

या परिसंवादात देशभरातील २० जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यांतील नाविन्यपूर्ण उपक्रम सादर केले. या सादरीकरणामुळे जिल्हा व तालुका स्तरावर



परस्पर शिक्षणाची संधी, तसेच नवकल्पनांना चालना मिळाली. या कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी, नीति आयोग बी. व्ही. आर. सुब्रमणियन, व्यवस्थापकीय संचालक रोहित कुमार, आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

या सादरीकरणाद्वारे आरोग्य धमनी उपक्रमातील नवकल्पना, आंतरविभागीय समन्वय आणि आदिवासी आरोग्य क्षेत्रातील मोजता येणारे यश यांची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. नंदुरबार जिल्ह्यासाठी हा अभिमानाचा क्षण असून, आरोग्य व पोषण क्षेत्रातील जिल्ह्याची कामगिरी इतर जिल्ह्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## लहुजी शक्ती सेनेच्या महिला नेत्या प्रियंकाताई लांडगे यांचा दिल्लीत सन्मान

### रामदास आठवले यांच्या हस्ते समाज गौरव महिला राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**केज । प्रतिनिधी**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे पुरस्कार वितरण सोहळा तसेच जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी या कार्यक्रमास देशभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला तसेच मान्यवरांना पुरस्काराने सन्मान करण्यात आला या पुरस्कारामध्ये बीड जिल्ह्यातील केज शहरातील लहुजी शक्ती सेनेच्या बीड जिल्हाध्यक्षा तसेच महिला नेत्या सौ.प्रियंकाताई दत्ता लांडगे यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याची नोंद



घेत त्यांची समाज गौरव महिला या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले हा पुरस्कार केंद्रीय समाज कल्याण मंत्री रामदास आठवले तसेच भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष लालसिंह आर्या, राज्यसभा खासदार अनिल बोंडे, यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला यावेळी देशभरातून विविध राज्यातील लेखक साहित्यिक तसेच कनिष्ठ व जेष्ठ नेते कार्यकर्ते तसेच लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश महासचिव बालाजीभाऊ गायकवाड प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीभाऊ गायकवाड उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे केंद्रीय जयंती समितीचे अध्यक्ष विनोदजी जाधव,काकासाहेब मोरे,यांनी केले होते.

## रमाई माता यांचा पुतळा उभारण्याच्या मागणीसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली नगर पालिकेला दिले निवेदन

### भीमसृष्टीमध्ये माता रमाई यांचा पुतळा उभारण्यात यावा-अशोक भाऊ वाघमारे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात नगरपालिकेच्या माध्यमातून भीमसृष्टीमध्ये माता रमाई यांचा पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी अशोक भाऊ वाघमारे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.बीड शहरात बीड नगर पालिकेच्या अनेक महापुरुषांचे पुतळे उभारण्यात आलेले आहेत. मात्र बौद्ध समाजाच्या माता रमाई यांचा पुतळा उभारण्यात आलेला नाही. त्यामुळे भीमसृष्टीमध्ये माता रमाई यांचा पुतळा उभारण्यात यावा अशा मागणीचे निवेदन अशोक भाऊ वाघमारे यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना घडविण्यात माता रमाई यांचा मोठा हात होता.ज्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर विदेशात जाऊन शिक्षण घेत होते त्यावेळी माता रमाई यांनी हाल अपेष्टा झेलून आपल्या कुटुंबाचा सांभाळ केला होता. त्यांनी बाबासाहेबांना शिक्षण घेता यावी म्हणून कधीच कुटुंबाची अडचण सांगितली नाही त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अनेक वाद्य घेऊन विद्वान झाले. त्यांच्या तल्लख बुद्धीतून राज्यघटना लिहिली गेली. पेठ बीड भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या परिसरात भीमसृष्टी उभारण्यात आलेली आहे. या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या यांच्या जयंती आणि महापरिनिर्वाणदिनी बौद्ध समाज हजारोंच्या संख्येने अभिवादन करायला येत असतो. मात्र माता रमाई माता शहरात कुठेच पुतळा नसल्याने बौद्ध समाजाला आपआपल्या घरीच माता रमाई यांच्या जयंती दिनी अभिवादन करावे लागते. माता रमाई यांचा पुतळा बीड शहरात उभारण्याची मागणी मागील अनेक वर्षापासून बौद्ध समाज



करत आहे मात्र या मागणीकडे बीड नगरपालिकेचे दुर्लक्ष असल्याने बौद्ध समाजातून नाराजगी व्यक्त करण्यात येत आहे. भीमसृष्टीमध्ये माता रमाई यांचा पुतळा उभारला  गेल्यास बौद्ध समाज हजारोंच्या संख्येने याठिकाणी उपस्थित राहून अभिवादन करेल. माता रमाई यांचा पुतळा उभारण्यासाठी भीमसृष्टी येथील जागा उपलब्ध असल्याने या ठिकाणी पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनातून अशोक भाऊ वाघमारे यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना केली आहे. याप्रसंगी नगरसेवक गणेश वाघमारे, अशोक वीर, रवींद्र कदम,विकास जोगदंड, प्रेम चांदणे, बिबीशन लांडगे, इकबाल शेख, सय्यद मुस्तफा, अमोल पवळ, दत्ता जाधव, डॉ.रमेश शिंदे, गोरख मोमीन, दादा कांबळे, सोनवणे आकाश, माजेद कुरेशी, साजिद जहागीरदार, मिलिंद ठोकळ यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## थेरोंडा-पालव साकव अखेर कोसळलाच; प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षितपणामुळे ग्रामस्थ आगीत

**अलिबाग । प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील थेरोंडा – पालव या दोन गावांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा साकव आज कोसळून पडला आणि अखेर प्रशासनाच्या झोपेचे भयानक परिणाम उघड झाले. ग्रामस्थांमध्ये संतापाचा उद्रेक झाला असून, त्यांनी आता प्रशासनाला थेट जबाबदार धरले आहे.

या साकवाची अवस्था गेल्या अनेक महिन्यांपासून धोकादायक बनली होती. काँग्रेस नेते अशोक आंबुकर यांनी वेळोवेळी प्रशासनाला इशारे दिले, निवेदने दिली, साकवाच्या स्थितीकडे लक्ष वेधले. वेळीच उपाययोजना नाही केल्यास मोठी दुर्घटना होईल, असा थेट इशारा त्यांनी दिला होता. पण नेहमीप्रमाणेच सरकारी ढिसाळपणा आणि टाळाटाळ यामुळे आज अखेर तो साकव कोसळलाच.हा साकव म्हणजे शालेय विद्यार्थी, वृद्ध, रुग्ण आणि शेतकऱ्यांसाठी जीवनवाहिनीच होती. दररोज शेकडो नागरिक याच मार्गाने प्रवास करत होते. मुसळधार पावसामुळे पाण्याचा जोर वाढला आणि पूर्वीपासूनच खचलेल्या साकवाने शेवटी साथ सोडली.आता नागरिक अक्षरशः पेटले आहेत. दुर्घटनेपूर्वीच जर हे टाळता आलं असतं, तर हा संताप जन्मालाच नसता, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाच्या अक्षम्य गलथान कारभाराचा आता तीव्र निषेध होत असून, ग्रामस्थांनी तात्काळ नव्या साकवाच्या कामाला सुरुवात न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.यासोबतच, अशा धोकादायक साकवांची तत्काळ तपासणी करून पावसाळ्याआधीच योग्य उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. नाहीतर पुढचा अपघात केव्हा आणि कुठे होईल, याची कुणालाच कल्पना नसेल – आणि त्याची जबाबदारी पुन्हा एकदा झोपलेल्या प्रशासनावरच येईल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077